**<u>ठळक बातम्या</u>**

- १८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन येत्या २४ तारखेपासून, तर राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन येत्या २७ तारखेला सुरु होणार
- विधान परिषदेच्या ४ जागांपैकी ३ जागांवर महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात थेट लढत
- आगामी विधानसभा निवडणुकांसाठी राष्ट्रवादी काँग्रेसची ‘एकच लक्ष्य, विधानसभा क्षेत्र’ मोहीम

**आणि**

- टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा अमेरिकेशी सामना

**<><><><><>**

१८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन येत्या २४ तारखेपासून सुरू होणार आहे. या अधिवेशनात नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी, लोकसभेच्या सभापतींची निवड, राष्ट्रपतींचं अभिभाषण आणि त्यावर चर्चा होईल. राज्यसभेचं २६४ वं अधिवेशन २७ जूनपासून सुरू होईल आणि संसदेचं हे अधिवेशन ३ जुलै रोजी संपेल.

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन येत्या २७ जून रोजी सुरु होणार आहे. या अधिवेशनाची अधिसूचना राज्यपाल रमेश बैस यांनी आज जारी केली.

**<><><><><>**

विधान परिषदेच्या ४ जागांसाठीच्या निवडणुकीकरता उमेदवारी अर्ज मागं घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. विविध उमेदवारांनी अर्ज मागं घेतल्यानंतर या निवडणुका◌ीतल्या लढतींचं चित्र स्पष्ट झालं आहे.

आज अखेरच्या दिवशी कोकण पदवीधर मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे किशोर जैन, आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे किशोर सरैय्या यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला. तर, याच मतदारसंघात शिवसेनेच्या संजय मोरे यांनी माघार घेतली आहे. त्यामुळे महायुतीचे निरंजन डावखरे विरुद्ध महाविकास आघाडीचे रमेश कीर यांच्यात थेट लढत होणार आहे.

मुंबई पदवीधर मतदारसंघात शिवसेनेचे दीपक सावंत यांनी उमेदवारी अर्ज मागं घेतला आहे. त्यामुळे या मतदारसंघात भाजपाचे किरण शेलार, आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल परब यांच्यात लढत होईल. तर, मुंबई शिक्षक मतदारसंघात भाजपाचे शिवनाथ दराडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज. मो. अभ्यंकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवाजीराव नलावडे आणि शिक्षक भारतीचे सुभाष मोरे यांच्यात चौरंगी लढत होणार आहे.

नाशिक शिक्षक मतदार मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संदीप गुळवे हे महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवणार आहेत. या मतदार संघात आज अखेरच्या दिवसांपर्यंत एकूण १५ उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यामुळे आता संदीप गुळवे, शिवसेनेचे किशोर दराडे, आणि अपक्ष उमेदवार विवेक कोल्हे अशी लढत रंगणार आहे.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकांसाठी राष्ट्रवादी काँग्रेसनं एकच लक्ष्य, विधानसभा क्षेत्र ही मोहीम हाती घेतली असून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजित पवार, आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे राज्यव्यापी दौरे करणार आहेत. सुनील तटकरे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. लोकसभा निवडणुकीतली उणीव भरून काढून आम्ही विधानसभा निवडणुकींना सामोरं जाऊ, असं ते म्हणाले. प्रफुल्ल पटेल यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर उद्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवार जाहीर केला जाईल , असं तटकरे यांनी सांगितलं.

महायुतीमध्ये कोणतेच वाद नाहीत. विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून आमच्यामध्ये कोणातही समज - गैरसमज निर्माण होणार नाही याची काळजी घेतली जाईल असं राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी वर्ताहर परिषदेत सांगितलं.

**<><><><>**

केंद्रातलं भाजपा आघाडी सरकार निधी वाटपात सातत्यानं महाराष्ट्राला सापत्नभावाची वागणूक देत असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

महाराष्ट्रातून जीएसटीसह सर्व प्रकारच्या कर संकलनातून सर्वात जास्त निधी केंद्र सरकारकडे जमा होतो पण राज्याला निधी देताना मात्र हात आखडता घेतला जातो. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर राज्यांना निधी वितरित करण्यात आला. त्यात भाजपाशासित उत्तर प्रदेशाला सर्वात जास्त २५ हजार कोटी रुपये, मध्य प्रदेशाला १० हजार ९७० कोटी, तर सरकारला पाठिंबा देणाऱ्या नितीशकुमार यांच्या बिहारला १४ हजार कोटी रुपयांचा निधी दिला आहे. पण महाराष्ट्राला केवळ ८ हजार कोटी रुपये देऊन तोंडाला पानं पुसली आहेत, अशी टीका पटोले यांनी केली आहे.

**<><><><>**

महाराष्ट्राचा जर्मनीतल्या बाडेन-वुटेनबर्ग या राज्याशी उद्योग क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ पुरवण्याकरता झालेला करार हा मानव संसाधन विकास क्षेत्रातला मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. या कराराच्या अनुषंगानं सुकाणू समितीची बैठक जर्मनीत स्टुटगार्ड इथं झाली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभाग नोंदवला. त्यावेळी ते बोलत

होते. या करारामुळे दोन्ही राज्यांच्या आर्थिक विकासाला हातभार लागेल, तसंच भविष्यात विविध क्षेत्रांमधला सहकार्याचा मार्ग मोकळा होईल, असं ते म्हणाले.

स्टुटगार्ड इथल्या या बैठकीत शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्यासह बाडेन-वुटेनबर्गचे मुख्यमंत्री विनफ्रीड क्रेत्शमन आणि संबंधित खात्यांचे मंत्री, तसंच कुलपती डॉ फ्लोरिअन स्टेगमन सहभागी झाले होते.

**<><><><><>**

प्रदेश काँग्रेसचे सचिव प्रशांत गावंडे, माजी आमदार नारायणराव मुंडे आणि प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस सत्संग मुंडे यांना सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्याचे निर्देश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिले आहेत, असं काँग्रेसचे संघटन आणि प्रशासन उपाध्यक्ष नाना गावंडे यांनी सांगितलं आहे. लोकसभा निवडणुकीत पक्षविरोधी कारवाई केल्यामुळे ही कारवाई केल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना अमेरिकेसोबत होणार आहे. न्युयॉर्कमधे नासॉ कौंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर, भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री ८ वाजता हा सामना सुरु होईल.

**<><><><><>**

शेतकऱ्यांना युरिया आणि डीएपी खतांचा तुटवडा भासू नये यासाठी सरकारतर्फे खतांचा संरक्षित साठा करण्यात येतो. पणन महासंघासह इतर संस्थांनी गरजेनुसार आपल्या वाट्याच्या खतसाठ्याची उचल करावी, तसंच गरज असेल तर कृषी विभागानं पणन महासंघाला अतिरिक्त कोटा मंजूर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात घेतलेल्या बैठकीत दिले आहेत. या बैठकीला कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदा पहिल्यांदाच मुंबईसह पुणे, दिल्ली, कोलकाता आणि चेन्नईमध्ये चित्रपट प्रदर्शित केले जाणार आहेत. शनिवारपासून सुरू होणारा हा महोत्सव २१ जूनपर्यंत सुरू राहणार आहे. मुंबईत फिल्म डिविजनच्या प्रांगणात आणि पुण्यात राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात याअंतर्गत चित्रपट दाखवले जातील. ऑनलाइन नोंदणीशिवाय थेट येणाऱ्यांनाही चित्रपट प्रदर्शनाच्या ठिकाणी नोंदणी करता येईल.

यंदाचा महोत्सव दिव्यांगस्नेही होण्यासाठी स्वयम या स्वयंसेवी संस्थेसोबत NFDC ने भागीदारी केली आहे. या महोत्सवातले चित्रपट कर्णबाधित व्यक्तींसाठी सब टायटल्स आणि हातवाऱ्यांच्या भाषेसह प्रसारित केले जातील. दृष्टीबाधित व्यक्तींना या चित्रपटांची माहिती स्वतंत्रपणे ऐकता येईल, असं महोत्सवाचे संचालक प्रिथुल कुमार म्हणाले. दिव्यांगजन फिल्म याअंतर्गत ४ विशेष चित्रपट १९ जून रोजी महोत्सवात दाखवले जातील.

**<><><><><>**

कर्करोगाच्या रुग्णांना दिल्या जाणाऱ्या किरणोपचार पद्धतीचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी तयार केलेली ॲक्टोसाइट ही गोळी आज अणुऊर्जा विभागात आयोजित कार्यक्रमाद्वारे बाजारपेठेत उपलब्ध करण्यात आली.

भाभा अणुसंशोधन केंद्र, कर्करोग संशोधन आणि शिक्षण केंद्र, टाटा मेमोरियल रुग्णालय आणि एका खासगी प्रयोगशाळेच्या शास्त्रज्ञांनी तयार केलेली या गोळीचा चांगला परिणाम विशेषतः शरीराच्या खालच्या भागातल्या अवयवांचे कर्करोग झालेल्या रुग्णांमध्ये दिसून आल्याचं भाभा अणुसंशोधन केंद्राच्या किरणोपचार जैवशास्त्र आणि आरोग्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्राध्यापक संतोष संडूर यांनी सांगितलं. या गोळीला भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाची मंजुरी मिळालेली आहे आणि यावर पुढच्या वैद्यकीय चाचण्या सुरू आहेत. तसंच किमोथेरपीच्या दुष्परिणामांवरसुद्धा ही गोळी परिणामकारक आहे का, याचीही

चाचपणी सुरू आहे. भारतीय औषध नियामक प्राधिकरणाची मंजुरी अद्याप या गोळीला मिळालेली नाही.

<><><><><>

आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री म्हणून तेलुगु देसम पार्टीचे अध्यक्ष नारा चंद्राबाबू नायडू यांनी, तर ओदिशाचे मुख्यमंत्री म्हणून भाजपाचे ज्येष्ठ नेते मोहन चरण माझी यांनी आज शपथ घेतली. आंद्र प्रदेशात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यपाल एस अब्दुल नझीर यांनी नायडू यांच्यासह २४ मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. जनसेना पार्टीचे अध्यक्ष के. पवन कल्याण यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. या सोहळ्याला अनेक केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसंच आंध्र प्रदेशाच्या इतर शेजारी राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते.

ओदिशामधे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांच्याबरोबरच उपमुख्यमंत्री म्हणून कनकवर्धन सिंह देव आणि प्रवती परिदा यांना ओदिशाचे राज्यपाल रघूबर दास यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

<><><><><>

देशात १ जुलैपासून भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम लागू केले जाणार आहेत. या कायद्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी पत्र सूचना कार्यालय देशभरात अनेक ठिकाणी परिसंवाद आयोजित करणार आहे, असं माहिती सेवा विभागाचे अधिकारी राजेश सिन्हा यांनी सांगितलं. याच निमित्तानं उद्यापासून रांची इथं आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादाबाबत ते बातमीदारांशी बोलत होते.

<><><><><>

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह

सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे. या काळात मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता असून तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह सोसाट्याचे वारे वाहतील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.